**आयुक्तालय, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य नवी मुंबई**
रायगड भवन, रिअर विंग, पहिला मजला, सी.बी.डी.बेलापूर - ४००६१४
Email - comicdsraigadbhavan@gmail.com & icds_mh@yahoo.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५७६३८८

क्र. एबाविसेयो/का-२/२२९ /२०१७, नवी मुंबई | दिनांक १९ / ०१/ २०१७

प्रति,
अध्यक्ष / सचिव

महिला मंडळ / बचत गट
(सर्व तांत्रिकदृष्टया उत्पादन केंद्र तपासणीसाठी पात्र ठरलेले ४३ निविदाधारक)

**विषय:- THR पुरवठयासाठी सादर केलेल्या अर्जाबाबत.**

**संदर्भ:- या कार्यालयामार्फत दि. ०८.०३.२०१६ रोजी प्रकाशित online निविदा.**

संदर्भिय जाहिरातीव्दारे THR पुरवठयासाठी Online निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर निविदा अर्जाची अंतिम छाननी झाल्यानंतर दिनांक ०६.०१.२०१७ रोजी ४३ निविदाधारकांना पुढील प्रकीयेसाठी (उत्पादन केंद्र तपासणीसाठी) पात्र करण्यात आलेले आहे. ४३ निविदाधारकांची यादी व उत्पादन केंद्र तपासणीसंबंधी सूचना ICDS व E-Tender च्या Website वर प्रकाशित करण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये उत्पादन केंद्राची तपासणी दिनांक ०९.०१.२०१७ पासून करण्यात येणार आहे. उत्पादन केंद्राची तपासणी करण्याच्या एक दिवस अगोदर निविदा अर्जात नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्यात येईल व निविदाधारकांनी त्यांचे उत्पादन केंद्र कार्यान्वित ठेवणे आवश्यक राहील व त्याच दिवशी प्रयोगशाळा तपासणी करिता निविदेतील नमुद पाककृतीनुसार नमुने तपासणी समितीकडून (Draw samples from running Plant) घेण्यात येतील असे कळविण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने दि. १६.०१.१७ पासून प्रत्यक्ष उत्पादन केंद्र तपासणी सुरु झालेली आहे, दिनांक १६.०१.१७ ते २५.०२.१७ पर्यत तपासणी सुरु राहणार आहे. दरम्यानच्या काळात आपले उत्पादन केंद्र सुरु ठेवणे अनिवार्य आहे. तपासणीच्या २४ तास अगोदर आपणांस आपण Tender Form वर दिलेल्या मोबाईल क्रमांकावर उत्पादन केंद्र तपासणीबाबत कळविण्यात येईल. ज्यांचे उत्पादन केंद्र तपासणी पथकाला बंद आढळून येईल त्यांना निविदेत स्वारस्य नसल्याचे गृहित धरुन त्यांचा अर्ज रदद करण्यात येईल व त्यांच्या अर्जावर पुढे कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही. तसेच निविदा अर्जामध्ये निविदाधारकाने जो उत्पादनाचा केंद्राचा पत्ता दिलेला आहे त्याच ठिकाणी तपासणी करण्यात येईल, अन्य पत्त्यावरचे उत्पादन केंद्र तपासली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**आयुक्त**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना**
**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**